# इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र

नोंदणी क्र. ९८३, दि. ११ नोव्हेंबर १९७४

# राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा

## शनिवार, ९ जानेवारी २०२७

**परीक्षाशुल्क प्रतिविद्यार्थी रु. ७०/-**

## शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध व प्रकल्प स्पर्धा २०२६-२०२७

'डॉ. अ. रा. कुलकर्णी पारितोषिक' शिक्षकांसाठी निबंधस्पर्धा

'डॉ. अरविंद देशपांडे पुरस्कार' – शिक्षकांसाठी प्रकल्प स्पर्धा

## विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६-२०२७

इ. ५ वी – ८ वी लहान गट, इ. ९ वी – १० वी मोठा गट, इ. ११ वी – १२ वी वरिष्ठ गट

इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र, ही संस्था महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे ३० (एस.सी.ई.आर.टी.) यांची मान्यताप्राप्त राज्यस्तरीय विषय संघटना आहे. तिची स्थापना १९७४ साली झाली. ही संस्था शिक्षक व विद्यार्थी यांच्या व्यक्तिमत्व व गुणवत्ता विकासासाठी सामाजिक भान ठेवून सुमारे ५० वर्षे सातत्याने कार्य करीत आहे. ही परीक्षा फक्त क्रमिक पुस्तकांवर आधारित आहे. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा म्हणून गेली २३ वर्षे राज्यस्तरीय 'इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा' व विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. तसेच मागील ५० वर्षे शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी 'इतिहास शिक्षक' त्रैमासिक प्रसिद्ध केले जाते.

## *विद्यार्थ्यांच्या याद्या व परीक्षा शुल्क पाठविण्याची अंतिम मुदत*
## *शनिवार, दि. ५ डिसेंबर २०२६*

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी **'इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा'** ही एक सुवर्णसंधी उपलब्ध करीत आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात स्पर्धा परीक्षांना इतिहास नागरिकशास्त्र / राज्यशास्त्र हे विषय अनिवार्य आहेत. त्यामुळे या विषयांचे महत्त्व पटू लागले आहे. या विषयांचे महत्त्व शालेय स्तरावर लक्षात यावे व त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात यशस्वी वाटचाल करणे शक्य व्हावे, या सद्हेतूने **'इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र'** तर्फे **'इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा'** (इ. ५ वी, इ. ६ वी व इ. ७ वी -– **बाल प्रज्ञावंत**, इ. ८ वी व इ. ९ वी – **किशोर प्रज्ञावंत** व इ. १० वी – **कुमार प्रज्ञावंत**) सुरू केलेल्या आहेत. **'पुणे व कोल्हापूर या दोन्ही ठिकाणी दोन कार्यालये'** सुरु करण्यात आलेली आहेत.

**इ. ५ वी ते इ. १० वी या वर्गांसाठी परीक्षा घेण्यात येणार आहे.**

**यावर्षी ही परीक्षा शनिवार, दिनांक ९ जानेवारी २०२७ रोजी सकाळी ११ ते १२ वाजता घेण्यात येणार आहे.**

**परीक्षेबाबत माहिती :**

● **इयत्ता ५ वी ते इयत्ता १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा आहे.** ● या परीक्षेत इतिहास व नागरिकशास्त्र / राज्यशास्त्र या विषयांचा समावेश आहे. ● ही परीक्षा **मराठी** व **इंग्रजी** माध्यमांत असेल. ● उत्तीर्ण होण्यास किमान ४० गुण आवश्यक विद्यार्थ्यांना यशस्वी झाल्याबद्दल महामंडळातर्फे प्रशस्तिपत्रे देण्यात येतील. ● प्रत्येक इयत्तेत **प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकास रोख पारितोषिक, विशेष गुणवत्ता प्रशस्तिपत्र व मानचिन्ह** महामंडळातर्फे देण्यात येईल.

**● प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर एकापेक्षा जास्त विद्यार्थी असल्यास पारितोषिकाची रक्कम विभागून देण्यात येईल, परंतू कमीत कमी रु. १००/- पारितोषिक दिले जाईल. ● प्रत्येक शाळेस प्रशस्तिपत्र व संबंधित इतिहास शिक्षकांनाही प्रोत्साहनपर प्रशस्तिपत्रे देण्यात येतील. ● ज्या शाळेतून १५० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होतील अशा शाळेस विशेष सन्मानचिन्ह दिले जाईल. ● २७ जानेवारी २०२७ रोजी उत्तरतालिका प्रसिद्ध केली जाईल. त्यावर काही आक्षेप असल्यास ते दि. ४ फेब्रुवारी २०२७ पर्यंत नोंदवता येतील. त्यांचा विचार करून निकाल लावला जाईल.**

**परीक्षेचा अभ्यासक्रम :**

● **बाल प्रज्ञावंत इ. ५ वी :** इ.४ थी चा संपूर्ण अभ्यासक्रम व इयत्ता ५ वी चा परिसर भाग २ (इतिहास) प्रकरण १ ते ६, परिसर भाग १ (ना. शास्त्र) मधील प्रकरण ५ व ६ ● **बाल प्रज्ञावंत इ. ६ वी :** इ. ५ वी चा संपूर्ण अभ्यासक्रम (इतिहास व नागरिकशास्त्र – इ. ६ वी इतिहास प्रकरण १ ते ६ व

नागरिकशास्त्र १ ते ३) ● **बाल प्रज्ञावंत इ. ७ वी :** इ. ६ वी चा संपूर्ण अभ्यासक्रम (इतिहास व नागरिकशास्त्र – इ. ७ वी इतिहास प्रकरण १ ते ७ व नागरिकशास्त्र १ ते ३) ● **किशोर प्रज्ञावंत इयत्ता ८ वी :** इ. ७ वी चा संपूर्ण अभ्यासक्रम (इतिहास व नागरिकशास्त्र – इ. ८ वी इतिहास प्रकरण १ ते८ नागरिकशास्त्र १ ते ३) ● **किशोर प्रज्ञावंत इयत्ता ९ वी :** इ. ८ वी चा संपूर्ण अभ्यासक्रम (इतिहास व नागरिकशास्त्र – इ. ९ वी इतिहास प्रकरण १ ते ५ व राज्यशास्त्र १ ते ३) ● **कुमार प्रज्ञावंत इयत्ता १० वी :** इ. १० वी चा इतिहास व राज्यशास्त्राचा संपूर्ण अभ्यासक्रम.

**नावनोंदणी व इतर :**

● शालाप्रमुखांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या नावाच्या याद्या इयत्तेनुसार तयार करून कोल्हापूर किंवा पुणे विभागाकडे पाठवाव्यात. ● यादीवर मुख्याध्यापकांची सही व शिक्का आवश्यक राहील. शाळेचा पूर्ण पत्ता पिनकोडसहित तसेच शाळेचा दूरध्वनी क्रमांक STD कोडसहित व संबंधित शिक्षकाचा मोबाईल नंबर तसेच E-mail ID असणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शाळेशी संपर्क ठेवणे शक्य होणार नाही याची नोंद घ्यावी. शक्यतो ई-मेल ने याद्या पाठवाव्यात. **(itihaspradnya@gmail.com)** ● उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांच्या छापील नावांसह व क्रमांकासह परीक्षेच्यावेळी देण्यात येतील. संबंधित विद्यार्थ्यांव्यतिरिक्त अन्य विद्यार्थ्यांसाठी तिचा वापर करता येणार नाही. ● गैरहजर विद्यार्थ्यांची कोरी उत्तरपत्रिका परत पाठवावी.

● परीक्षेचे सर्व काम संगणकीकृत असल्याने परीक्षा विभागाकडे पूर्वी दिलेल्या यादीव्यतिरिक्त अन्य विद्यार्थ्यांचा परीक्षेत समावेश करता येणार नाही.

● सर्व शाळांनी परीक्षेनंतर फक्त उत्तरपत्रिका एकाच पार्सलने फक्त पुणे येथील कार्यालयात पाठवाव्यात.

**परीक्षाशुल्क व इतर बाबी :**

परीक्षाशुल्क प्रतिविद्यार्थी रु. ७०/- राहील. रु. ५०/- प्रमाणे होणारे महामंडळ कार्यालयाकडे पाठवावेत. ● विद्यार्थ्यांची किमान संख्या ३० असावी. (१० पेक्षा कमी विद्यार्थ्यांची यादी पाठवू नये.)

**परीक्षाकेंद्र खर्चाबाबत :**

- शाळेकडे प्रतिविद्यार्थी रु. २० प्रमाणे जमा झालेल्या रकमेतून खालीलप्रमाणे खर्च करावा.
  ● केंद्रसंचालक मानधन रु. १००/- ● पर्यवेक्षक मानधन रु. ७५/- (५० विद्यार्थीपर्यंत १ पर्यवेक्षक) ● सेवक मानधन रु. ४०/- व उर्वरित रक्कम पोस्टेज व बँक कमिशनसाठी वापरावी.
- **'इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र' याच नावाचा Payable at Pune** किंवा **Payable at Kolhapur** असा **डी.डी. काढावा व सर्व तपशील** भरून पोस्टाने अथवा कुरिअरने पाठवावा.

**किंवा**

- **बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेत** ऑन अकाउन्ट पैसे **इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र,** या नावेच पुणे/कोल्हापूर यापैकी ज्या ठिकाणी विद्यार्थी यादी पाठवणार त्या ठिकाणच्या खात्यावर पैसे भरावेत.

**बँक ऑफ महाराष्ट्र, नारायण पेठ शाखा, पुणे सेव्हिंग्ज खाते क्र. २०१२४५४२७४० IFSC MAHB0000154**
**बँक ऑफ महाराष्ट्र, राजारामपुरी शाखा, कोल्हापूर सेव्हिंग्ज खाते क्र. २००४१०१४५१८ IFSC MAHB0000410**

बँकेच्या चलनाची काऊंटरफॉईलची झेरॉक्स प्रत मिळाल्याशिवाय परीक्षाशुल्क मिळाले असे समजले जाणार नाही. काऊंटर फॉईलवर शाळेचे नाव लिहिणे आवश्यक आहे. विद्यार्थी यादीच्या शेवटी परीक्षा शुल्काचा तपशील नीट भरावा.

**● इयत्ता ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांच्या याद्या व परीक्षाशुल्क पाठविण्याची अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२६ ही राहील.**

**विशेष सूचना** – केंद्रात सामूहिक कॉपीचा संशय आल्यास सदर केंद्राचा निकाल राखून ठेवण्याचा अधिकार महामंडळाकडे राहील. परीक्षेच्या निकालाचा अंतिम निर्णय महामंडळाचा राहील. ३१ मार्च २०२७ पर्यंत परीक्षेचा निकाल मिळाला नाही तर महामंडळाशी ताबडतोब संपर्क साधावा.

## 'इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र'
## शिक्षकांसाठी राज्यस्तरीय विविध उपक्रम

### 'डॉ. अ. रा. कुलकर्णी पारितोषिक' – शिक्षकांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६-२०२७

ज्येष्ठ गाढे अभ्यासक, पुणे विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे संस्थापक व आद्य **प्रमुख कै. डॉ. अ. रा. कुलकर्णी** (१९२५-२००९) यांच्या नावाने 'इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र' तर्फे **इतिहासविषयक राज्यस्तरीय निबंधस्पर्धा शिक्षकांसाठी आयोजित करण्यात येते. ही निबंधस्पर्धा मराठी व इंग्रजी भाषेतून घेण्यात येते.** या स्पर्धेत महाराष्ट्रातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना सहभाग घेता येईल.
प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या शिक्षकांना 'डॉ. अ. रा. कुलकर्णी पुरस्कार' रु. १०००/- रोख, गौरवचिन्ह व विशेष गुणवत्ता प्रशस्तिपत्र देण्यात येते.

**निबंधाचा विषय (शब्दमर्यादा १५०० शब्द)**
**भारताची जागतिक नेतृत्वाकडे प्रभावी वाटचाल (The Glorious Progress of India Towards Global Leadership)**

● वरील विषयावर शिक्षकांनी आपला निबंध **मुख्याध्यापकांच्या शिफारशीसह व सही-शिक्क्यासह 'कोल्हापूर कार्यालया'** च्या पत्त्यावर पाठवावा. निबंधासोबत **शिक्षकांनी घरचा संपूर्ण पत्ता व मोबाईल नं.** पाठविणे अनिवार्य आहे. ● शिक्षकांनी आपला निबंध मराठी किंवा इंग्रजी माध्यमात पाठवावा. प्रत्येक माध्यमासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतात. ● निबंध सुवाच्य व फुलस्केप कागदाच्या एकाच बाजूवर लिहिलेला असावा. शक्यतो टंकलिखित असावा. निबंधाचे शैक्षणिक वर्ष (उदा. २०२६-२०२७) लिहावे. **निबंधासोबत प्रवेशशुल्क रु. ५०/- पाठवावेत.** ● निबंध पाठविण्याची अंतिम मुदत **५ डिसेंबर २०२६** ही राहील. त्यानंतर प्राप्त झालेल्या निबंधाचा स्पर्धेसाठी विचार करण्यात येणार नाही.

# इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा (HISTORY TALENT SEARCH) २०२६ - २०२७

विद्यार्थ्यांची संपूर्ण नावे अकारविल्हेवारी (ABCD प्रमाणे) करून पाठवावीत.

**विद्यार्थी यादी** दिनांक :

**शाळेचे नाव -** ______________________________

**संपूर्ण पत्ता(जवळच्या खुणेसह) -** ______________________________

______________________________ **पिनकोड :**

**फोन नं. - Std. code.** **Phone** **शाळेचा Email-ID** ______________

**Name and Mobile No. of concerned teacher.**
**संबंधित शिक्षकाचे नाव व त्यांचा मोबाईल नंबर**

**इ. वी / STD.**

| S.No. | Surname Name Father's Name | S.No. | Surname Name Father's Name |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

| S.No. | Surname | Name | Father's Name | S.No. | Surname | Name | Father's Name |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

* वर दिलेल्या नमुन्यानुसार विद्यार्थ्यांच्या नावाच्या याद्या इ. ५ वी ते इ. १० वी इयत्तेनुसार तयार करून कोल्हापूर किंवा पुणे विभागाकडे पाठवाव्यात.

खालीलप्रमाणे परीक्षाशुल्क भरलेले आहे.

ऑनलाईन / ड्राफ्ट / कॅश

बँकेचे नाव : ____________________

शाखा : ____________________

दिनांक : रक्कम :

मुख्याध्यापकांची सही व शिक्का

## ‘अरविंद देशपांडे पुरस्कार’ – शिक्षकांसाठी प्रकल्प स्पर्धा २०२६ -२०२७

इतिहासाचे गाढे अभ्यासक, पुणे विद्यापीठ इतिहास विभागाचे प्रमुख, बालभारती व एस. एस. सी. बोर्डाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष **कै. डॉ. अरविंद देशपांडे (१९३७-२००२)** यांच्या नावाने ‘इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र’ - तर्फे दरवर्षी इतिहास अध्यापन प्रकल्प स्पर्धा आयोजित करण्यात येते. सर्वोत्कृष्ट अध्यापन प्रकल्प सादर करणाऱ्या शिक्षकांना **‘डॉ. अरविंद देशपांडे पुरस्कार’ रु. १०००/- रोख, गौरवचिन्ह व विशेष गुणवत्ता प्रशस्तिपत्र** देण्यात येते.

**प्रकल्पासाठी महत्त्वाच्या सूचना :** या पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्यातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील सर्व शिक्षकांना सहभाग घेता येईल. सहभाग घेणाऱ्या शिक्षकांनी आपल्या इतिहास अध्यापन प्रकल्पाची माहिती मराठी किंवा इंग्रजी माध्यमात शाळेच्या **मुख्याध्यापकांच्या सही-शिक्क्यासह कोल्हापूर विभागीय कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावेत. प्रकल्पासोबत शिक्षकांनी घरचा संपूर्ण पत्ता व मोबाईल नं. पाठवणे अनिवार्य आहे.** इतिहास अध्यापन प्रकल्पाची माहिती फुलस्केप कागदावर एकाच बाजूस सुवाच्य अक्षरात लिहिलेली असावी.

● प्रकल्प, मुख्याध्यापकांच्या शिफारशीसह व सही-शिक्क्यासह कोल्हापूर कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा. ● प्रकल्प पाठविण्याचा अंतिम **दिनांक ५ डिसेंबर २०२६** राहील. **● प्रकल्पासोबत प्रवेशशुल्क रु. ५० पाठवावेत. ● प्रकल्प लेखकाने घरचा पूर्ण पत्ता पिनकोडसह व मोबाईल नं. सहीत द्यावा.** ● प्रकल्पासोबत सदर प्रकल्प स्वतःचा असून तो अन्यत्र छापला नसल्याचे पत्र स्वतःच्या सहीने पाठवावे.

## विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय निबंध स्पर्धा २०२६ -२०२७

‘इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र’ तर्फे विद्यार्थ्यांसाठी इतिहासविषयक निबंधस्पर्धा गेली अनेक वर्षे तीन गटांत घेण्यात येते.

*** लहान गट :** इयत्ता ५ वी ते ८ वी *** मोठा गट :** इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी *** वरिष्ठ गट :** इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी

ही निबंधस्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात येते. ही स्पर्धा मराठी व इंग्रजी दोन्ही माध्यमातून असते, प्रत्येक गटात प्रत्येक माध्यमात पहिल्या तीन क्रमांकांना रोख पारितोषिके व विशेष गुणवत्ता प्रशस्तिपत्रे देण्यात येतात. निबंध स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सहभागाची प्रशस्तिपत्रे देण्यात येतात.

**स्पर्धेचे स्वरूप :** शाळास्तरावर या परिपत्रकातील विषयानुसार वरील तीन गटांत स्पर्धा आयोजित करावी. **शाळेतील इतिहास शिक्षकांनी ते निबंध तपासून त्यामधून प्रत्येक गटातील पहिल्या तीन क्रमांकांचे निवडक एकूण ९ ते १२ निबंध महामंडळाच्या 'कोल्हापूर कार्यालया' कडे विद्यार्थी यादीसह पाठवावेत. निबंधस्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना कोणतेही शुल्क नाही, ही स्पर्धा विनामूल्य आहे. मात्र निबंधावर मुख्याध्यापकांची शिफारस, सही व शिक्का असणे आवश्यक आहे. शिक्षकबंधूंनी सहकार्य करावे. निबंध पाठविण्याची अंतिम मुदत ५ डिसेंबर २०२६ असेल.**

### विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धेचे विषय

**१) लहान गट : इयत्ता ५ वी ते ८ वी (शब्दमर्यादा: ५०० शब्द) वेदकालीन वैभवशाली वैदिक वाङ्मय (The Glorious Vedic Literature in Vedic Civilization.)**

**२) मोठा गट : इयत्ता ९ वी व १० वी (शब्दमर्यादा: ७५० शब्द) भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतीकारकांचे प्रभावी योगदान (The Prominent Contribution of the Armed Revolutionaries in the Indian Freedom Moment)**

**३) वरिष्ठ गट : इयत्ता ११ वी व १२ वी (शब्दमर्यादा: १००० शब्द) जागतिक शांततेसाठी भारताचे प्रभावी प्रयत्न (The Prominent Efforts of India for International Peace)**

**सूचना : ● निबंधाच्या सुरुवातीला विद्यार्थ्याचे नाव, इयत्ता व शाळेचे नाव पूर्ण पत्त्यासह लिहावे, तसेच त्यावर वर्ष २०२६-२७) लिहावे.** निबंध सुवाच्य व फुलस्केप कागदावर एकाच बाजूवर लिहिलेला असावा. ● मुख्याध्यापकांनी सही शिक्क्यासह निबंध पाठवताना शाळेच्या **लेटरहेडवर विद्यार्थ्यांच्या नावाची यादी सोबत जोडावी.** ● मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे निबंध व **शाळेचा पूर्ण पत्ता-पिनकोडसह व शाळेचा फोन नं. किंवा संपर्क मोबाईल क्रमांक, विद्यार्थ्यांचा घरचा पत्ता व संपर्क मोबाईल क्रमांक, विद्यार्थ्यांची इयत्ता** लिहिले आहे ते तपासून कोल्हापूर येथील कार्यालयाच्या पत्यावर पाठवावेत. **ज्या शाळा निबंधस्पर्धेत व परीक्षा स्पर्धेत दोन्ही ठिकाणी सहभागी होणार आहेत त्यांनी निबंध व विद्यार्थी यादी फक्त कोल्हापूर येथे पाठवावेत. पुणे कार्यालयाकडे पाठवू नयेत.**

### ◈ ◈ प्रज्ञाशोध परीक्षा व निबंधस्पर्धांसाठी संपर्क ◈ ◈

**पुणे कार्यालय**

**‘इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र’**

**● श्री. बापूसाहेब शिंदे, अध्यक्ष**

**● श्रीमती अलका काळे, उपाध्यक्ष**

**द्वारा : श्री. विजयचंद्र थत्ते**
श्री मुद्रण मंदिर, ९१४, सदाशिव पेठ,
नागनाथपाराजवळ, बॅ. गाडगीळ स्ट्रीट, पुणे – ४११०३०

**द्वारा : श्री. हेमंत वाळिंबे**
स्मार्ट कॉम्प्युटर इंडिया प्रा. लि., २०६३, सदाशिव पेठ,
नू. म. वि. मुलींच्या शाळेसमोर, पुणे - ४११०३०

**सरचिटणीस, श्री. विजयचंद्र थत्ते (पुणे) मो. नं. : ९५५२५८८५४०**

**श्री. हिंगमिरे (नाशिक) मो. नं. : ९४२२९४६३७२**

**कोल्हापूर कार्यालय**

**‘इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र’**

**श्री. बापूसाहेब शिंदे, अध्यक्ष**, ब – २ सम्राट को-ऑप. हौसिंग सोसायटी, राजारामपुरी ८ वी गल्ली, (टाकाळा) कोल्हापूर – ४१६००८ **मो. ९४२२५६६६८९**

**श्री. प्रकाश रानमाळे (मुख्याध्यापक),** विक्रम हायस्कूल, शिवाजीपार्क, एस टी स्टॅंड जवळ, कोल्हापूर, ४१६००१ **मो. ९१५८९८९२९७**

**सौ. सुप्रिया भोसले (मुख्याध्यापिका),** छ. युवराज शाहू महाराज विद्यालय, गांधीनगर, कोल्हापूर **मो. ९८२२८४२५६९**

**श्री. दिलीप नंदिवाले (गडहिंग्लज) : ८२७५९१९२२१ श्री. परदेशी (घोडेगाव) : ९४२३२५४१५२ श्री. संजय वझरेकर (लोधीवली) : ९९७५५७६६७५**

BOOK-POST

प्रेषक : श्री. बापूसाहेब शिंदे
अध्यक्ष – इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र
द्वारा – श्री. विजयचंद्र थत्ते
श्री मुद्रण मंदिर
११४, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

# इतिहास शिक्षक महामंडळ, महाराष्ट्र

## राज्यस्तरीय इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा / निबंधस्पर्धा

**२०२६ – २०२७**

**खालील वेबसाईट माहितीपत्रक उपलब्ध आहेत.**

**www.itihasshikshak.org**

**E-mail : itihaspradny@gmail.com**